**3.4.1 - Extension activities are carried out in the neighborhood community, sensitizing students to social issues, for their holistic development, and impact thereof during the year**

- **New Voter Awareness By NSS**

## लोकमत

नमाद महाविद्यालयाचा उपक्रम : निवडणूक प्रक्रियेची दिली नागरिकांना माहिती

# विद्यार्थ्यांनी केली गावागावात नवमतदार जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**गोंदिया :** उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार कार्यालय, नमाद महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील ग्राम सेजगावसह परिसरातील गावागावांत नवमतदार जनजागृती कार्यक्रम प्राचार्या डॉ.शारदा महाजन यांच्या मार्गदर्शनात नुकताच राबविण्यात आला.

रासेयो कार्यक्रम अधिकारी व समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.बबन मेश्राम यांनी नवमतदारांमध्ये मतदार प्रक्रियेसंदर्भात जनजागृती करून मतदान प्रक्रियेत त्यांचा जास्तीतजास्त सहभाग वाढावा, या हेतूने भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाविद्यालयात व परीसरात नवमतदार नोंदणी अभियान आणि जनजागृती कार्यक्रम राबविला. यावेळी अप्पर तहसीलदार विशाल सोनवाने यांनी कार्यक्रमाचे प्रमुख उद्देश, निवडणूक प्रक्रिया, तसेच शासनाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या जनजागृतीविषयक विविध कार्यक्रमांची माहिती दिली.



जनजागृती उपक्रमात सहभागी झालेले नमाद महाविद्यालयातील विद्यार्थी.

प्राचार्या डॉ.महाजन यांनी, मतदान करणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य असून, सशक्त, सुदृढ भारताच्या निर्मितीसाठी मतदानाच्या टक्केवारी वाढीबरोबरच उमेदवार निवड गुणवत्ताही वाढली पाहिजे, असे मत व्यक्त केले. निवडणूक मंडळ अधिकारी डोमेश हत्तीमारे यांनी, शासनाच्या वतीने विद्यार्थांना शैक्षणिक कामकाजाकरिता देण्यात येणारे आणि अन्य नागरिकांना आवश्यक असलेले विविध दाखले व ते काढण्यासाठीची अर्जप्रक्रिया कशी असते, त्याची माहिती दिली.

वाणिज्य विभागप्रमुख डॉ.रवींद्र मोहतुरे यांनी नवमतदारांना मार्गदर्शन केले. सरपंच प्रमोद पटले यांनी, मतदारांनी अधिक सजगपणे मतदानाच हक्क बजावला पाहिजे, असे सांगितले. यावेळी रासेयो निवडणूक ॲम्बेसिडर प्रफुल्ल उके, झामसिंग बघेले, सार्थक बोरकर, प्राची कटरे, गायत्री बनकर, रासेयो स्वंयसेवक, गावकरी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

Hello Gondia
Page No. 3 Mar 16, 2024
Powered by: erelego.com

## देशोन्नती

# रासेयो द्वारा गावा-गावात नवमतदार जनजागृती

### एनएमडी महाविद्यालयांचा स्तुत्य उपक्रम

**गोंदिया** ■ उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार कार्यालय, एन. एम. डी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग व राष्ट्रिय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील सेजगावसह परीसरातील गावा-गावात नवमतदार जनजागृती कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्या शारदा महाजन यांच्या मार्गदर्शनात नुकतेच राबविण्यात आले.

रासेयो कार्यक्रम अधिकारी व समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बबन मेश्राम यांनी नवमतदारांमध्ये मतदार प्रक्रियेसंदर्भात जनजागृती होऊन मतदान प्रक्रियेत त्यांचा जास्तीत जास्त सहभाग वाढावा, या हेतूने भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाविद्यालयात व परीसरात नवमतदार नोंदणी अभियान आणि जनजागृती कार्यक्रम राबविला.

यावेळी अप्पर तहसीलदार विशाल सोनवाने यांनी नवमतदार जनजागृती





कार्यक्रम आयोजित करण्याचा प्रमुख उद्देश, निवडणूक प्रक्रिया, शासनाच्या वतीने आयोजित करण्यात येणारे जनजागृती विषयक विविध कार्यक्रम यांची माहिती दिली. एन. एम. डी महाविद्यालयाचे प्राचार्य व राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शारदा महाजन यांनी मतदान करणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य असून, सशक्त, सुदृढ भारताच्या निर्मितीसाठी मतदानाच्या टक्केवारी वाढीबरोबरच उमेदवार निवड गुणवत्ताही वाढली पाहिजे, असे मत व्यक्त केले. तसेच निवडणूक मंडळ अधिकारी डोमेश हत्तीमारे यांनी शासनाच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामकाजाकरिता देण्यात येणारे आणि अन्य नागरिकांना आवश्यक असलेले विविध दाखले, ते काढण्यासाठीची अर्जप्रक्रिया यांची माहिती दिली. वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रविन्द्र मोहतुरे यांनी नवमतदारांना मार्गदर्शन केले.

Deshonnati Edition
Mar 16, 2024 Page No. 6

- **Distribution of Cloths Poor and Needy by NSS**

देशोन्नती

# नमाद महाविद्यालयात 'माणुसकीचा झरा' उपक्रमाचे आयोजन



गोंदिया शिक्षण संस्था द्वारा संचालित एन.एम.डी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व समाजशास्त्र विभाग द्वारा 'माणुशकीचा झरा' या उपक्रमा अंतर्गत वापरण्या योग्य कपडे, साड्या, चादरी, ब्लॅकेटस, लहान मुलांची खेळणी, सायकल, नविन जुने शैक्षणिक साहित्य, वह्या, वाचनीय पुस्तके, गृहउपयोगी साहित्य, तसेच विविध प्रकारच्या वस्तू संकलीत केल्या जात आहेत. त्या वस्तू समाजातील गरजूंना राष्ट्रीय सेवा योजना चे स्वयंसेवक यांचे मार्फत वितरीत केल्या जातील. तेव्हा प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी, पालक यांनी अधिक -अधिक सहयोग द्यावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शारदा महाजन व कार्यक्रम अधिकारी डॉ. बबन मेश्राम, डॉ.अश्वीनी दलाल, प्रा.रवीकुमार रहांगडाले यांनी केले आहे.

देशोन्नती वृत्तसंकलन...

**गोंदिया** ■ गोंदिया शिक्षण संस्था द्वारा संचालित नटवरलाल मानिकलाल दलाल महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व समाजशास्त्र विभाग यांच्या वतीने २६ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत माणूसकीचा झरा व दीप उत्सव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय सेवा योजना विभाग, एन.एम.डी कॉलेज, गोंदिया येथे सकाळी ९ते दुपारी १२ वाजता या वेळेत संकलन सुरु करण्यात आले आहे.

उपक्रम दरम्यान आपल्याकडील वापरणे योग्य वस्तूंचे संकलन ते गरजूपर्यत पोहोचवले जाणार आहे.सामाजिक, शैक्षणिक , सांस्कृतिक क्षेत्रातील राष्ट्रीय बाण्यातील उपक्रमशिल व प्रगत भारतीय समाज तसेच प्रबळ भारत राष्ट्राचे सैदव चिंतन करणारे

Deshonnati Edition
Oct 28, 2023 Page No. 8
Powered by : eReleGo.com

- National Flag Rally by NSS

## नवराष्ट्र

# शहरात राष्ट्रीय सेवा योज स्वंयसेवकांद्वारे तिरंगा रॅ

### नमाद महाविद्यालयात नि :शुल्क राष्ट्रध्वजाचे वि



गोंदिया, ब्युरो. स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण होत असल्याने 'हर घर तिरंगा' हा उपक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हाती घेतला. त्याचेच प्रबोधन व्हावे, ज्यांनी प्राणांची आहुती दिली त्यांचा सन्मान व्हावा. या हेतूने 11 ऑगस्ट रोजी शहरात नमाद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयंसेवकांनी तिरंगा रॅली काढली.

15 ऑगस्ट स्वतंत्र्य दिवस धुमधडाक्यात साजरा करण्यासाठी नटवरलाल माणिकलाल दलाल महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना स्वंयसेवकांनी 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्याचा चंग बांधून घरो-घरी तिरंगा ध्वज फडकविण्यासाठी जनजागृती मोहीम सुरू केली. राष्ट्रध्वज लावण्यासाठी रासेयो स्वंयसेवकांनी शहरातील मुख्य रस्ता व प्रभागात तिरंगा यात्रा काढून राष्ट्रध्वाजाचे महत्त्व नागरिकांना पटवून दिले. 'हर घर तिरंगा' अभियान गोंदिया शिक्षण संस्था सचिव राजेंद्र जैन, संचालक निखिल जैन यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्या डॉ. शारदा महाजन यांच्या अध्यक्षतेखाली तसेच डॉ. बबन मेश्राम यांच्या नेतृत्वात राबविण्यात येत आहे. महाविद्यालयात 9 ऑगस्ट रोजी शहीद दिन व आदिवासी दिनाच्यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. 10 ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांना 200 तिरंगा ध्वजाचे वितरण ऑगस्ट रोजी 'माझी माती मा 'घरो-घरी तिरंगा' अभियानां रॅलीला प्राचार्या डॉ. शारद यांनी झेंडी दाखवून रवाना के दिल की पुकार हैं तिरंगा ह है..' या जयघोषात 'हर घ उपक्रमांतर्गत रॅली काढली. प्र शारदा महाजन यांनी हर संस्था व घरोघरी तिरंगा फड यावे, या साठी रॅली सांगितले. रासेयो कार्यक्रम डॉ. बबन मेश्राम यांनी ही केले. तिरंगा रॅली प महाविद्यालयातून शहर भागातून काढण्यात आली.

### यांनी केले सहव

तिरंगा रॅलीमध्ये तिरंगा ध्वजसो स्वयंसेवकांनी उत्साहात सहभा अभियानाच्या यशस्वीतेसाठी प्रा राकेश खंडेलवाल, डॉ. अर्चना ज शिरीष कुदळे, डॉ. सुयोग इंगले, बिश्वास, डॉ. मस्तान शहा, डॉ. मोहतुरे, डॉ. उमेश उदापुरे, मुस्त रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. रहांगडाले, डॉ. तारक पटले तसे महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, कर्मचारी व रासेयो स्वयंसेवकां केले.

Gondia Edition
14 August 2023 Page No. 4
epaper.navarashtra.com

## नवभारत

# रासेयो स्वंयसेवक ने निकाली तिरंगा रैली

### NMD महाविद्यालय में निःशुल्क तिरंगा ध्वज का वितरण



गोंदिया, ब्यूरो. आजादी के 75 साल पूरे होने पर देश में अमृत महोत्सव मनाया जा रहा है. इस साल स्वतंत्रता दिवस को धूमधाम से मनाने के लिए एनएमडी कॉलेज के राष्ट्रीय सेवा योजना के स्वंयसेवक द्वारा तैयारी चल रही है. इसी कड़ी में हर घर तिरंगा अभियान भी चलाया जा रहा है. घर-घर तिरंगा लहराने और शहर भर में तिरंगा लगाने को लेकर एन.एस.एस स्वंयसेवकों की ओर से शहर में तिरंगा रैली निकाली गई. यह अभियान गोंदिया शिक्षण संस्था सचिव तथा पूर्व विधायक राजेंद्र जैन, संचालक निखिल जैन के मार्गदर्शन में प्राचार्या डा. शारद महाजन की अध्यक्षता तथा एनएसएस पूर्व जिल समन्वयक डा. बबन मेश्राम के नेतृत्व में चलाया ज रहा है. इस दौरान वरिष्ठ प्रा.डा. राकेश खंडेलवाल, डा. अर्चना जैन, डा. शिरीष कुदडे, डा. सुयोग इंगले, प्रा. रत्ना बिश्वास, डा. मस्तान शहा, डा. रवींद्र मोहतुरे, डा. उमेश उदापुरे, मुस्तफा शेख, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. रवीकुमार रहांगडाले उपस्थित थे. तिरंगा रैली एनएमडी महाविद्यालय से शहर के आस-पास क्षेत्रों में निकाली गई.

Gondia Edition
14-august-2023 Page No. 4
epaper.enavabharat.com

- Play On Freedom Movements

# नवभारत

## ‘आजाद हिंद गाथा’ नाटक का मंचन

### शहीद दिवस पर 75 महाविद्यालयों में हुई प्रस्तुति



■ **गोंदिया (का).** आजादी के अमृत महोत्सव के उपलक्ष में आजाद हिंद की गाथा नाटिका एन.एम.डी महाविद्यालय के ऑडिटोरियम में आयोजित हुई. जिसमें राष्ट्रीय सेवा योजना के स्वयंसेवक कलाकार द्वारा प्रस्तुति की गई. नाटिका का उद्घाटन प्राचार्या डा. शारदा महाजन के हस्ते, गोंदिया शिक्षण संस्था के संचालक निखिल जैन के मार्गदर्शन में हुआ. प्राचार्य डा. महाजन ने मार्गदर्शन किया. प्रास्तावना में कार्यक्रम अधिकारी डा. बबन मेश्राम ने शहिद दिन का औचित्य में महाराष्ट्र में एक हजार से अधिक रासेयो स्वयंसेवक, छात्र, कलाकार, तथा नाट्य निर्माता महाराष्ट्र के 36 जिलों में एक ही दिन 75 महाविद्यालयों में नाट्यप्रयोग का प्रस्तुतिकरण किया गया. यह प्रकल्प महाराष्ट्र शासन के सांस्कृतिक मंत्रालय, महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय सेवा योजना व आर्टिस्टिक ह्यूमन्स के संयुक्त तत्वावधान में संगीतमय आजाद हिंद गाथा मराठी नाटिका का आयोजन किया गया था. यह नाटिका दर्शन महाजन, विद्यानाथ सुर्वे लिखित है तथा रचना यह आर्टिस्टिक ह्यूमन्स ने की. नाटिका प्रस्तुति में कलाकार महाविद्यालय के रासेयो स्वंयसेवक निखिल बन्सोड, सांरग बहेकार, सार्थक बोरकर, ममता नाईक, अमित बडोले, झामसिंग बघेले, शिवानी हाडगे, धनंजय झगेकर, अभय पटले, सुशील गौतम, आरती मौजे, डिंपल ढोरे, डिंपल धुवारे, ज्ञानेश्वरी हत्तीमारे, हर्षू बावनकर, सुहानी ठाकरे, पुनम वाघाडे, रोहित बिसेन इन कलाकारों ने डा. बबन मेश्राम के मार्गदर्शन में नाटिका का प्रस्तुतिकरण किया.

Gondia Edition
26-march-2023 Page No. 3
epaper.enavabharat.com

- Observation of Police Martyr day

# देशोन्नती

## नमाद महाविद्यालयात पोलीस स्मृती दिवसानिमित्त वीर मातेचा सन्मान

**गोंदिया** ■ गोंदिया शिक्षण संस्था द्वारा संचालित येथील नटवरलाल माणिकलाल दलाल महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेना व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने पोलीस स्मृती दिनानिमित्त नक्षली हल्ल्यात शहीद झालेल्या जवानाच्या मातेचा, वीर मातेचा सन्मान करण्यात आला.



संस्थेचे मार्गदर्शक प्रफुल पटेल, अध्यक्ष वर्षा पटेल, सचिव राजेंद्र जैन, संचालक निखिल जैन यांच्या मार्गदर्शनात प्राचार्या डॉ. शारदा महाजन यांच्या नेतृत्वात पोलीस स्मृती दिनानिमित्त ८ नोव्हेंबर २०२१ रोजी गडचिरोली जिल्ह्यात कर्तव्य बजावत असताना नक्षली हल्ल्यात शहीद झालेले संजीव धोंडोजीं कावरे व ३० मे २००५ रोजी सालेकसा तालुक्यात शहीद झालेले रवीकुमार सेवकराम जौंजाळ या शहीद झालेल्या जवानांच्या वीर मातेच्या सत्कार आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. शारदा महाजन तर प्रमुख अतिथी म्हणून वीर माता कमलाबाई कावरे, रामनगर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू बस्तवाडे उपस्थित होते. २ कार्यक्रमाला उपस्थित शहीद वीर संजीव धोंडोजीं कावरे यांच्या आई, वीर माता मलाबाई कावरे यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. वीर शहीद संजीव धोंडोजीं कावरे, व रवीकुमार सेवकराम जौंजाळ यांच्या प्रतिमांना माल्यार्पण व दीप प्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. एक मिनिट मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू बस्तवाडे यांनी पोलीस स्मृती दिवस का आणि कधी साजरा केला जातो याची माहिती सांगितली. २१ ऑक्टोबर १९५९ मध्ये भारत चीन सीमेवर चीन सैनिकांच्या भ्याड हल्ल्यात भारताचे १० जवान शहीद झाले. तेव्हापासून म्हणजे २१ ऑक्टोबर १९६० पासून शहीद जवानांच्या स्मृतीनिमित्त पोलीस स्मृती दिवस पाळण्यात येतो. यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्या डॉ. महाजन म्हणाल्या, आपण आपल्या इच्छा, आकांक्षा जर देशासाठी अर्पण केल्या तर जीवन देश सेवेस अर्पण होते. परंतु प्रत्येकालाच सैनिक म्हणून देशाची सेवा करण्याचे भाग्य मिळत नाही. आपण सामान्य नागरिक म्हणून स्वच्छता मोहिमेत सहभागी परिसर स्वच्छ, नीट आणि प्रदूषणमुक्त ठेवण्याची जबाबदारी पार पडली तरी देशसेवा घडते. त्यामुळे प्रत्येकाने, खास करून युवकांनी, ज्यांना देशाच्या रक्षणासाठी वर्दी धारण करण्याची संधी मिळत नाही, अशा युवकांनी देशसेवेचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत त्यात सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्या महाजन यांनी केले. कार्यक्रमाला अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या डॉ. एस यु खान, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रवींद्र मोहतुरे, डॉ. बबन मेश्राम, डॉ. अंबादास बाकरे, डॉ. किशोर वासनिक, डॉ. शशिकांत चौरे, डॉ. प्रियदर्शनी नंदेश्वर, प्रा. घनशाम गेडेकर, प्रा. प्रणव वासनिक उपस्थित होते. जण गण मन या राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन प्रणिता तुरकर, प्रास्ताविक डॉ.एच पी पारधी तर आभार डॉ. योगराज बैस यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय छात्र सेनेचे स्वयंसेवक, महाविद्यालयीन प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी सहकार्य केले.

Deshonnati Edition
Oct 23, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

- Organized Street play on Indian Poverty Problem and Solution on the occasion of International Poverty Day on 18th Oct. 2023






- **Nukkad Natak on Financial Literacy - sent video entries to BSE (Bombay Stock Exchange) on 16th Oct 2023 in order to celebrate World Investor Week and Management Institutes**




- **NCC Unit celebrates ‘World Environment Day’ on 15th May 2023 and organized Public Awareness Rally**













- **On the occasion of Mahatma Gandhi & Lal bahadur Shashtri Jayanti NCC Unitorganizes Swachh Bharat Abhiyan 2nd Oct. 2023**








- **ICC organizes Karate Training Camp ( 3 Months) (Mahila Dhoran-2014 in JointCollaboration with Judo Karate, Yoga and Life Skill Training (Training Institute-**Matoshri Bahuuddeshiya Santha, Nagpur .on 22nd March 2024






लोकमत

# विद्यार्थिनींनी घेतले कराटेचे प्रशिक्षण

## नमाद महाविद्यालयाचा उपक्रम : तीन महिन्याचे कराटे प्रशिक्षण शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

गोंदिया : मुलींना स्वतःचे संरक्षण स्वतः करता यावे, शारीरिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात या हेतूने गोंदिया शिक्षणसंस्थाद्वारा संचालित येथील नटवरलाल माणिकलाल दलाल महाविद्यालयात तीन महिने कालावधीचे कराटे प्रशिक्षण शिबिर राबविण्यात येत असून, त्याची सुरुवात नुकतीच करण्यात आली.

प्राचार्या डॉ. शारदा महाजन यांच्या नेतृत्वात महाविद्यालयातील अंतर्गत निवारण समितीच्या वतीने तीन महिने कालावधीचे कराटे प्रशिक्षण खास मुलींसाठी राबविण्यात येत आहे. प्रशिक्षण शिबिराला नुकतीच सुरुवात झाली. वाणिज्य विभागप्रमुख डॉ. रवींद्र मोहतुरे, अंतर्गत निवारण समितीच्या प्रमुख डॉ. अर्चना जैन, खेळ आणि क्रीडा कारकीर्द विकास फाउंडेशनचे दीपक सिक्का, मानव हक्क संघटनेचे जिल्हा सचिव आदेश शर्मा, राज्य सचिव धार्मिष्ठा सेंगर उपस्थित होते.

विद्यार्थिनींना कराटेबाबत मार्गदर्शन करताना दीपक सिक्का.

कराटे प्रशिक्षण दीपक सिक्का यांनी विविध प्रात्यक्षिके करुन विद्यार्थिनींनी स्वतःचे संरक्षण कसे करावे, यावर मार्गदर्शन केले. लहान लहान बाबीसुद्धा लक्षात ठेवल्या तरी संकटकाळी स्वतःचा बचाव स्वतः करता येईल. हिम्मत न हारता आत्मविश्वासाने संकटाला सामोरे गेले तर नक्कीच यशस्वी होऊ असे, दीपक सिक्का यांनी सांगितले. आईवडील हे आपले हितचिंतक नव्हे सर्वस्व. मुलींनी आईवडिलांपासून कोणतीही गोष्ट लपवू नये. मोबाइलचा मर्यादेत वापर करावा, संकटकाळी ११२ या टोल फ्री क्रमांकाचा वापर करावा, असे आदेश शर्मा यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अश्विनी दलाल, तर आभार डॉ. सरिता उदापूरकर यांनी मानले. कार्यक्रमासाठी डॉ. परवीन कुमार, डॉ. सौरभ चाटुले यांच्यासह महाविद्यालयीन प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

Hello Gondia
Page No. 4 Mar 24, 2024
Powered by: erelego.com




